<u>**निशाणी क्र. ३८८ वरील आदेश विशेष दिवाणी दावा क्र.१/२०२३**</u>

( जुना स्पे.मु.न.क्र.७९/२००२ तसेच त्यापूर्वीचा स्पे.मु.नं.२६७/१९९९ )

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.९ब यांनी निशाणी २५४ वरील आदेशात मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेमध्ये झालेल्या आदेशान्वये निशाणी २५४ चा आदेश रद्द करण्यात आला असल्याने तसेच मा.उच्च न्यायालयाच्या आदेशा अन्वये प्रतिदाव्याचा कोर्ट फी स्टॅम्प न्यायालयात जमा केल्याने प्रतिदाव्यास निशाणी देऊन प्रतिदावा रेकॉर्डवर घेण्याची विनंती केली.

२. वादी तर्फे प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये प्रतिवादी क्र.९ब यांना केवळ कोर्ट फी स्टॅम्प भरणेस परवानगी मिळाली आहे. प्रतिवादी क्र.९ब यांनी दाखल केलेला प्रतिदावा रेकॉर्डवर घेण्याचे मा.उच्च न्यायालयाने आदेश केलेले नाहीत. करीता अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

३. प्रतिवादी क्र.१५ तर्फे सदर अर्जास म्हणणे दाखल करण्यात आले असून प्रतिवादी क्र.९ब यांचा प्रतिदावा मुदतीत दाखल केलेला नाही. करीता अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

४. प्रतिवादी क्र.९ब चा अर्ज त्यावरील दोन्ही पक्षांचे म्हणणे तसेच निशाणी २५१ वरील आदेश तसेच रिट पिटीशन क्र.८८४१/२०२३ वरील आदेश दिनांक ३१.०१.२०२४ चे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवादाचा परामर्श घेतला.

५. प्रतिवादी क्र.९ब यांनी प्रस्तुत न्यायालयामध्ये निशाणी २५१ दाखल करुन प्रतिदावा दाखल करणेस परवानगी मागितली. सदर अर्जावर न्यायालयाने विस्तृत आदेश करुन अर्ज नामंजूर करण्यात आलेला आहे. प्रस्तुतचा अर्ज हा विहीत मुदतीत दाखल केलेला नाही. तसेच त्यावर विहीत मुदतीमध्ये कोर्ट फी स्टॅम्प भरण्यात आला नाही. या कारणाने प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात आला आहे. सदर आदेशाचे विरोधात प्रतिवादी क्र.९ब यांनी मा.उच्च न्यायालय, बॉम्बे रिट पिटीशन क्र.८८४१/२०२३ दाखल केला. सदरचा अर्ज मा.उच्च न्यायालयाने केवळ कोर्ट फी स्टॅम्प भरण्याबाबत मंजूर केलेला आहे.

म्हणजेच नि.२५१ चा आदेश केवळ कोर्ट फी स्टॅम्प भरणेचे हद्दीपर्यंत मंजूर केलेला असून निशाणी २५१ वरील उर्वरीत आदेश हा आहे त्या स्थितीत ठेवण्यात आलेला आहे.

६. सदर आदेशानंतर देखील प्रतिवादी क्र.९ब विहीत मुदतीमध्ये कोर्ट फी स्टॅम्प प्रस्तुत न्यायालयामध्ये जमा केला नसल्याने प्रस्तुत न्यायालयाने प्रतिवादी क्र.९ब चा निशाणी ३५२ चा अर्ज नामंजूर केला. सदर आदेशाच्या विरोधात प्रतिवादी क्र.९ब ने मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या अर्जा अन्वये दिनांक ०८.०४.२०२४ रोजी कोर्ट फी स्टॅम्प भरणेबाबत मा.उच्च न्यायालयाने आदेशित केले. त्या अन्वये प्रतिवादी क्र.९ब चा कोर्ट फी स्टॅम्प दिनांक ३१.०७.२०२४ रोजी जमा करुन घेतलेला आहे. वरील बाबींचे अवलोकन केले असता निशाणी २५१ वरील आदेश मा.उच्च न्यायालयाकडून संपूर्णतः रद्द करण्यात आलेला नाही. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये प्रस्तुत न्यायालयाने प्रतिदाव्याकरीता आवश्यक असलेला कोर्ट फी स्टॅम्प जमा करुन घेतलेला आहे. करीता प्रतिवादी क्र.९ब तर्फे दाखल करण्यात आलेला अर्ज कायद्यार्तंगत नसल्याने नामंजूर होणेस पात्र आहे. सबब पुढील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत आदेश नाहीत.

३. प्रस्तुतचा दावा हा वीस वर्षापूर्वीचा असल्याने दोन्ही पक्षकारांनी तो तात्काळ चालवण्याचे आदेशीत करण्यात येत आहे.

EKHE MEENA PRAKASH
Digitally signed by EKHE MEENA PRAKASH
Date: 2024.11.08 17:09:31 +0530

(मीना प्र. एखे)
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
करमाळा.

स्थळ – करमाळा.
दिनांक – ०८.११.२०२४.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of the this P. D. F. file Order/Judgment are same word to word, as per the original order/ judgment

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | B.R.Kondekar |
| Court Name | : | Civil Court Senior Division, Karmala |
| Date | | 08.11.2024 |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 08.11.2024 |
| Order uploaded on | : | 08.11.2024 |